# महान बनन्यासाटी जिम्मेदार बना

आजच्या युगात प्रत्येक व्यक्ती स्वतःला मोठा समजतो. तो दुसऱ्यांकडून स्वतःच्या मोठेपणाची दाद मागतो. लहान म्हणून घेणे व छोट्या मोठ्या पदांवर कोणीच बसू इच्छित नाही. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात श्रेष्ठता आणि महानतेसाठी संघर्ष चालू आहे. साधारण लोक, राजकीय नेते, प्रशासक व पुढारी सर्वजण या स्पर्धेत आहेत. मंथन करण्यायोग्य गोष्ट आहे की महानता किंवा मोठेपणा कसा प्राप्त केला जाऊ शकतो ?

काय कोणी जन्मताच महान असतो : काही लोकांचे असे मानणे आहे की, मोठे लोक मोठ्या घरातच जन्म घेतात. ज्यांना पूर्वजांकडून वारसापोटी पद, प्रतिष्ठा, अधिकार आणि धन, संपत्ती इत्यादी प्राप्त होते. काही जण असेही समजतात की मोठे बनण्यासाठी कोणीतरी गॉडफादर (शक्तीशाली व्यक्ती) पाहिजे. कोणी व्यक्ती कोणत्या क्षेत्रात संरक्षण देणारा असावा. नाहीतर सामाजिक संघर्षात योग्यता असून देखील मनुष्य मागे राहतो, परंतु वास्तविकता अशी नाही.

मोठ्या कार्याची जिम्मेदारीच मोठे बनविते. मोठेपणा कोण्या मोठ्या पदावर बसल्याने येत नाही, जोपर्यंत मोठ-मोठ्या जिम्मेदारींचा कुशलतेने आपण पार पाडीत नाही. एक लहान व्यक्तीदेखी जेव्हा आपला विचार मोठा बनवतो आणि मोठे कार्य प्रारंभ करतो, मोठी जबाबदारी घेणे शिकतो तर तो स्वतःच मोठा व महान बनतो. इतिहासात अनेक असे उदाहरणे आहेत जेव्हा साधारण लोकसुद्धा महान पदावर पोहोचले. आपल्या देशाचे महामहीम राष्ट्रपती आणि माननीय पंतप्रधान दोघेही सामान्य परिवारात जन्म घेऊन आणि सुरूवातीपासून लहान जिम्मेदारींचा निर्वाह करीत हळूहळू सीडी चढून आज राष्ट्राच्या दोन सर्वोच पदांवर विराजमान आहेत. ही बऱ्याच जणांसाठी एक मोठी प्रेरणा होऊ शकते.

महान बनण्यासाठी काय आवश्यक आहे : जे महानतेच्या मार्गावर आहेत, ते अवश्य जिम्मेदार आहेत आणि जे जिम्मेदार असतात ते कार्य लहान असो वा मोठे ते पूर्ण लगन, परिश्रम, इमानदारी, तत्परता आणि कुशलतेने करतात. जे जिम्मेवार आहेत ते कधीच बहानेबाजी करीत नाहीत. ते कोणत्याही कार्यासाठी त्याचा अभ्यास असो वा नसो आपली असमर्थता दाखवित नाही. जिम्मेदार व्यक्ती कार्य दुसऱ्यांवर सोपवित नाही, दुसऱ्यांचा सहयोग घेत-घेत तो हेच समजतो की हे कार्य माझे आहे, मला हे पूर्ण करावयाचे आहे. तो त्याच्या अपयशाचा दोष सुद्धा दुसऱ्यांवर न ठेवीत स्वतःच घेतो आणि लगेच त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. जर वास्तवात आपण महान बनू इच्छित असाल, तर महान व्यक्तींचे मार्गदर्शन आणि संगत शोधा आणि जे आमचे गुरू व वरिष्ठ आहेत, त्यांच्या आज्ञेचे आपण पुरेपूर पालन करावे. जी सुधारणा करण्यास सांगितली जाते, ती लवकरात लवकर करावी. जसे एक पालक स्वतः घराची जिम्मेवारी उचलतो. अनेक परिस्थिती व संकटातसुद्धा तो आपल्या कर्तव्यापासून डगमगत नाही आणि आपल्या मुलांना त्याचा आभास होऊ देत नाही. त्याचे हेच चरित्र त्याला मोठे आणि महान बनविते. अशाच प्रकारे मग आपण ज्या संघटनांत कार्य करतो आमहाला तेथील जिम्मेदार संरक्षकाची भूमिका बजावयास हवी आणि कठीण प्रसंगी सुद्धा आपल्या वरिष्ठ/कनिष्ठांबरोबर सहज राहून कार्य करायला हवे. जिम्मेदारीला ईमानदारीने निभावल्यास लहान व्यक्ती मोठा बनू शकतो.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**